INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 8.031 (SJIF 2025)

# अहिल्यानगर जिल्ह्यातील मुलींचा 3R दृष्टिकोन : एक वर्णनात्मक अभ्यास

# (A Descriptive Study on the 3R Approach among Girls in Ahilyanagar District)

**रूपाली बबन मोकाते**
M.sc, SET (Physics), M.Ed, SET, NET (Education),
(सहाय्यक प्राध्यापक),
विद्या प्रतिष्ठान (महाराष्ट्र ) संचलित,
शिक्षणशास्त्र महाविद्यालय (एम. एड्.), अहिल्यानगर (महाराष्ट्र, भारत)
E-mail: rupalimokate95@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/11.2025-32278943/IRJHIS2511020

**गोषवारा :**

*सदर संशोधन लेखामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यामधील मुलींच्या 3R दृष्टीकोनाचा – Reduce (वापर कमी करणे), Reuse (पुनर्वापर करणे) आणि Recycle (पुनर्निर्मिती करणे) – अभ्यास करण्यात आला आहे. आजच्या विज्ञान युगात पर्यावरणीय संकट आणि वाढते घरगुती प्लास्टिक प्रदूषण ही गंभीर समस्या निर्माण झाली आहे. या समस्येच्या निराकरणासाठी समाजात पर्यावरणपूरक सवयी रुजविणे गरजेचे आहे. महिला व किशोरवयीन मुलीं या घरगुती कामामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे मुलींच्या व महिलांच्या विचारसरणी व पर्यावरणीय कृतींचा अभ्यास करणे आवश्यक आहे.*

*या अभ्यासासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धती वापरून 100 विद्यार्थिनींकडून माहिती संकलित करण्यात आली. निष्कर्षानुसार मुलींमध्ये 3R विषयक जागृती मोठ्या प्रमाणात असूनही पुनर्वापर(Recycle) या घटकाविषयी अमंलबजावणी अपुऱ्या स्वरूपाची आहे. कुटुंब, शाळा आणि समाज यांच्या एकत्रित प्रयत्नांतून पर्यावरणीय वर्तन बळकट करता येईल.*

**महत्त्वाचे शब्द :** *3R दृष्टीकोन, अहिल्यानगर विकास, पुनर्वापर, मुलींचा सहभाग.*

## 1.1 प्रस्तावना :

पर्यावरण हे मानवी जीवनाचा आधारस्तंभ असून शहरीकरण, औद्योगिकरण आणि उपभोक्तावादामुळे प्रदूषणाचे प्रमाण मोठ्याप्रमाणात वाढले आहे. घरगुती प्लास्टिक कचऱ्याचे वाढते प्रमाण ही त्यातील एक गंभीर समस्या आहे. या संकटातून सुटका मिळवण्यासाठी *Reduce, Reuse* आणि *Recycle* हा 3R दृष्टीकोन जागतिक पातळीवर सर्वाधिक प्रभावी उपाय मानला जातो.

**3R दृष्टीकोन म्हणजे -**

- वापर कमी करणे. (Reduce)
- वस्तूंचा पुनर्वापर करणे (Reuse)
- पुनर्निर्मिती करणे. (Recycle)

अहिल्यानगर जिल्हा हा ग्रामीण आणि अर्धनगरी असलेला प्रदेश आहे. जिल्ह्यातील मुली शिक्षणासोबतच घरगुती कामकाजात सक्रिय सहभाग घेतात. त्यामुळे मुलींचा पर्यावरणाविषयीचा दृष्टीकोन आणि3R सवयींचा अभ्यास करणे हे पर्यावरणीय धोरणासाठी उपयुक्त आहे.

### 1.2 संशोधनाचे महत्त्व :

1. सध्याच्या अधुनिक काळात पर्यावरण शिक्षण केवळ सैद्धांतिक स्वरूपात न राहता प्रत्यक्ष कृतीशी जोडणे आवश्यक आहे.
2. किशोरवयीन मुली या समाजातील बदलाचे माध्यम आहेत. त्यांच्यात योग्य पर्यावरणीय सवयी विकसित झाल्यास त्याचा परिणाम हा संपूर्ण कुंटुबावर परिणामी समाजावर होतो.
3. 3R संबंधी माहिती ही ग्रामीण भागात अजूनही मर्यादित आहे. या अभ्यासातून त्या स्थितीचे वास्तविक चित्र समोर आणणे अपेक्षित आहे.
4. महिलांच्या पर्यावरणीय निर्णयक्षमतेवर आधारित धोरणे तयार करण्यात अभ्यासाचे निष्कर्ष मदत करू शकतात.

### 1.3 उदिद्ष्ट्ये :

1. अहिल्यानगर जिल्ह्यातील मुलींच्या 3R विषयक जाणीवपातळीचा व ज्ञानाचा अभ्यास करणे.
2. त्यांच्यामधील पर्यावरणीय वृत्ती व जबाबदारीचीजाणीव तपासणे.
3. सामाजिक आणि शैक्षणिक स्तरावर सुधारणा सुचविणे.

### 1.4 गृहीतके :

1. मुलींना 3R विषयक प्राथमिक माहिती असली तरी प्रत्यक्ष कृतीत आढळत नाही.
2. शहरी भागातील मुलींची 3R विषयक जाणीव ही ग्रामीण भागातील मुलींपेक्षा जास्त आहे.
3. आई-वडील व शिक्षकांचा प्रभाव मुलींच्या पर्यावरणीय वर्तनावर परिणाम घडवतो.

### 1.5 संशोधन पद्धती :

- संशोधनाचा प्रकार : वर्णनात्मक
- लोकसंख्या : अहिल्यानगर जिल्ह्यातील 10 शाळा.
- नमुना आकार : 100 विद्यार्थिनी .
- साधने : प्रश्नावली, निरीक्षण पद्धती, मुलाखत.
- माहिती विश्लेषण : संख्यात्मक माहितीचे टक्केवारीत विश्लेषण व गणात्मक माहितीचे विषयवार विश्लेषण.

### 1.6 साहित्य समीक्षा :

पर्यावरण जाणीव आणि 3R दृष्टीकोनावर विविध अभ्यास करण्यात आले आहेत.

1. भट्टाचार्य (2020) यांच्या ग्रामीण भारतातील प्लास्टिक व्यवस्थापन या लेखात पुर्नवापर सुविधचा अभाव ही मोठी अडचण असल्याने निदर्शनास आले.
2. मोकाते (2025) यांनी प्लास्टिक प्रदूषणाविषयी जाणीव जागृतीचा अभ्यास करताना महिलांचा स्थानिक स्तरावर प्रभावी सहभाग असल्याचे नमूद केले.
3. सुरेश आणि देशमुख(2022) यांनी विद्यार्थ्यांमधील 3R कृतींच्या परिणामकारकतेचा अभ्यास करताना स्पष्ट केले की प्रात्याक्षिक उपक्रम आणि स्पर्धा मुलांच्या वर्तनात सकारात्मक बदल घडवतात.
4. शर्मा (2021) यांनी भारतीय युवकांमधील पर्यावरण जागृती या अभ्यासात असे नमूद केले की युवकांमध्ये पर्यावरणीय विचारांच जागरूकता असली तरी प्रत्यक्ष कृतीत सातत्य कमी आहे.
5. UNEP (2023) अहवालानुसार शिक्षण संस्थांमधून3R संस्कृती रूजविणे हे शाश्वत विकासासाठी आवश्यक आहे.

वरील साहित्यांचा अभ्यासांचा विचार करता अहिल्यानगर जिल्ह्यांतील मुलींचा दृष्टीकोन तपासणे हा एक वेगळा व उपयुक्त संशोधन क्षेत्र आहे.

### 1.7 अहिल्यानगर जिल्ह्यातील सद्यस्थितीचा मुलींचा 3R दृष्टीकोन :

1. **पर्यावरणविषयी सकारात्मक जाणीव –**

अहिल्यानगर जिल्ह्यातील अनेक मुलींना पर्यावरण रक्षणाचे महत्त्व समजले आहे. शालेय शिक्षण, स्वच्छ भारत अभियान आणि माध्यमांच्या माध्यमातून त्यांच्यामध्ये जागृती निर्माण झाली आहे. मुलींना 3R म्हणजेच Reduce, Reuse, Recycle ही संकल्पना माहिती आहे.

2. **Reduce संकल्पनेचा अवलंब–**

मुली एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक वस्तू जसे की बाटल्या, पिशव्या, चमचे, कप इ. टाळण्याचा प्रयत्न करतात. अनेक मुली शाळेत स्वतःच्या पाण्याच्या बाटल्या आणतात. तसेच प्लास्टिकऐवजी स्टील बाटल्या आणि प्लास्टिक पिशव्या वापरण्याऐवजी कापडी पिशव्या सवय ठेवतात. त्यामुळे कचरा कमी होतो. मात्र ग्रामीण भागात दुकानदारांकडून मिळणाऱ्या प्लास्टिक पिशव्यांचा वापर अजूनही मोठ्याप्रमाणावर होतो.

3. **Reuse ची सवय –**

अनेक मुली जुन्या वस्तूंचा पुनर्वापरकरण्यास प्रवृत्त आहेत. उदा. जुन्या वह्याची वापरलेली पाने पुढील वर्षी वापरणे, जुने कपडे घर कामांसाठी वापरणे, बाटल्या, आणि डबे पुन्हा वापरणे इ. या सवयीमुळे वस्तूंचा अतिप्रमाणात अनावश्यक अपव्यय कमी होतं.

4. **Recycle विषयी मर्यादित ज्ञान –**

अहिल्यानगर जिल्ह्यात पुनर्वापर केंद्राची संख्या कमी असल्यामुळे मुलींमध्येRecycle विषयी प्रत्यक्ष अनुभव कमी आहे. शहरी तसेच ग्रामीण भागातील काही शाळांमध्ये पुनर्वापर प्रकल्प चालतात, पण ग्रामीण भागात याची जाणीव आणि सुविधा अपुऱ्या आहेत.

5. **शैक्षणिक प्रभाव –**

शाळांमध्ये शिक्षण, प्रकल्प, निबंध स्पर्धा आणि शिक्षकांचे मार्गदर्शन त्यामुळे मुलींचा दृष्टीकोन सकारात्मक झाला आ। शाळेतील शिक्षकांनी 3R संकल्पना व्यवहारात आणण्यासाठी प्रात्यक्षिक उपक्रम घेतले तर मुली अधिक प्रेरित होतात.

6. **घरगुती सवयींचा परिणाम –**

घरातील आई-वडीलांची सवयी व वर्तन आणि कुटुंबातील मूल्ये मुलींच्या पर्यावरणीय विचारसरणीवर परिणाम करतात. काही कुटुंबात कचरा वेगळा ठेवणे, पाण्याची बचत करणे, पुन्हा: पुन्हा वापरणे अशा सवयी आहेत, त्यामुळे मुलींच्या वर्तनातही बदल घडतो. परंतु अजूनही अनेक कुटुंबात या सवयीचा अभाव दिसून येतं.

7. **सामाजिक सहभाग व नेतृत्व –**

अनेक शाळांमध्ये मुली वृक्षारोपण, स्वच्छता अभियान आणि पर्यावरण दिन कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतात. गावात "प्लास्टिक मुक्त मोहिमा"चालवल्या जातात. या माध्यमातून मुलीं पर्यावरण संवर्धनाच्या लहान नेत्या बनत आहेत. परंतु अशा मोहिमांमध्ये सातत्य कमी आहे. सण उत्सवाच्या वेळी पुन्हा प्लास्टिकचा वापर मोठ्याप्रमाणात केला जातो.

8. **अडथळे –**

पायाभूत सुविधा व मानसिकतेचा अभाव– 3R दृष्टीकोन जोपासताना मुलींना अनेक समस्या भेडसावतात.

- पुर्नवापर केंद्रांचा अभाव आहे
- शाळेत , घरी कचरा वेगळा करण्यासाठी आवश्यक डबे किंवा कचरा कुंड्या नसणे.
- काही पालकांचा "हे वेळेचा अपव्यय" असा दृष्टीकोन. या अडचणींमुळे प्रयत्नांना मर्यादा येतात

9. **ग्रामीण-शहरी भागातील फरक -**

3R दृष्टीकोनची माहितीतील दरी ही शहरी भागात शिक्षण आणि इंटरनेटमुळे मुली जास्त आहेत. परंतु ग्रामीण भागात हे प्रमाण कमी दिसून येते. गावांतील शाळा व स्वयंसेवी संस्था ही दरी भरून काढण्याचा प्रयत्न करत आहेत.

10. **भविष्यातील प्रवृत्ती – सकारात्मक दिशा**

3R संस्कृती आता हळूहळू जीवनशैलीचा भाग बनत चालेली आहे. मुली या बदलाच्या केंद्रस्थानी असून शाळा, ग्रामपंचायत व स्वंयसेवी संस्था यांनी संयुक्त कृती केल्यास2030 पर्यंत अहिल्यानगर जिल्हा 'ग्रीन झोन' बनण्यास मदत होईल. मुली या परिवर्तनाच्या खऱ्या वाहक ठरू शकतात.

**1.8 अहिल्यानगर जिल्ह्यातील मुलींमध्ये 3R दृष्टिकोन वाढविण्यासाठी शिफारशी.**

1. शाळांमध्ये 3R कृती प्रकल्प राबविणे.
2. स्थानिक पातळीवर पुनर्वापर केंद्रांची स्थापना करणे.
3. शालेय व महाविद्यालयीन अभ्यासक्रमात पर्यावरण विषय कृतीप्रधान स्वरूपात समाविष्ट करणे.
4. ग्रामीण भागात स्वयंसेवी संस्थांनी प्रशिक्षण शिबिरे घेणे.

5. “Green Girl clubs” स्थापन करून मुलींचा प्रत्यक्ष सहभाग वाढविणे.
6. शाळा व महाविद्यालयांमध्ये 3R विषयावर कार्यशाळा आयोजित कराव्यात.
7. 3R ही संकल्पना अभ्यासक्रमात समाविष्ट करावी.
8. पोस्टर, निबंध, स्लोगन स्पर्धा यांसारख्या उपक्रमांतून संदेश द्याव
9. प्लास्टिक मुक्त शाळा मोहिम राबवावी.
10. मुलींनी तयार केलेल्या पुर्नवापर वस्तूंचे प्रदर्शन भरवावे.
11. स्थानिक स्वराज्य संस्था व NGO यांच्या माध्यमातून स्वच्छता मोहिमा राबवाव्यात
12. घरगुती कचरा वर्गीकरणाचे प्रशिक्षण द्यावे.
13. ‘इको क्लब’ स्थापन करून मुलींचा सक्रीय सहभाग वाढवावा.
14. 3R विषयक माहितीपत्रके, सोशल मीडिया कॅम्पेन, व्हिडिओ, वापरावेत.
15. 3R वर्तनाचे नियमित मुल्यांनकन व प्रोत्साहन द्यावे.

**1.9 भविष्यातील संशोधन दिशा :**

1. वेगवेगळ्या वयोगटातील मुलींची तुलना करणे
2. 3R विषयक प्रशिक्षणानंतर वर्तनात होणाऱ्या बदलांचे मोजमाप करणे.
3. महिलांच्या संघटनांद्वारे स्थानिकपातळीवरील पर्यावरण कृतींचा अभ्यास करणे.

**10. निष्कर्ष :**

संपूर्ण अभ्यासातून असे दिसून येते की अहिल्यानगर जिल्ह्यातील मुलींच्या मनामध्ये पर्यावरणाबद्दल सकारात्मक दृष्टीकोन ओ. मात्र ही जाणीव प्रत्यक्ष कृतीत रूपांतरित करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. शिक्षक, पालक स्थानिक संस्था आणि प्रशासन यांनी एकत्रितपणे काम केल्यास 3R संस्कृतीला चालना मिळून मुली या शाश्वत विकासाच्या परिवर्तनकर्त्या ठरू शकतात. 3R दृष्टीकोन ही केवळ संकल्पना नसून जीवनशैली आहे 3R हा केवळ दृष्टीकोन नसून मानवी जीवनाची जीवनशैली बनविणे हेच या संशोधन लेखाचे मुख्य ध्येय आहे.

**1.11 संदर्भ :**


1. देशमुख, वि. ग. (2018). पर्यावरण शिक्षण आणि शाश्वत विकास, पुणे : नित्यनूतन प्रकाशन.
2. जाधव, शीतल (2020). प्लास्टिक प्रदूषण आणि महिलांची जबाबदार्र. औरंगाबाद : पर्यावरण अध्ययन केंद्र.
3. महाराष्ट्र शासन (2023). स्वच्छ महाराष्ट्र अभियान - थ्री आर तत्त्वांचा वापर
4. मोरे सुभदा (2019). शालेय स्तरावर पर्यावरण संवर्धन उपक्रमांचा प्रभाव, कोल्हापूर : शिक्षण प्रतिष्ठान.
5. निंबाळकर, शशिकला (2019). मुलींच्या माध्यमातून पर्यावणीय मूल्र्यवर्धन : एक कृतीयुत्त्क अभ्यास. नाशिक : आधुनिक शिक्षण प्रकाशन.
6. Ajzen, I. (1991). The Theory of Planned Behavior. Organizational Behavior and Human Decision Processess, 50 (2), 179-211.
7. Ahmednagar Municipal Corporation. (2023). Solid Waste Management Initiatives Report.
8. Bandura, A. (1977). Social Learning Theory. Englewood Cliffs, NJ: Prentice Hall.
9. Central Pollution Control Board (CPCB). (2024). Plastic Waste Management Guidelines.
10. Sharma, R. & Singh, N. (2019). Awareness and Practies towards 3R among School Student in India. International Journal of Enviromental Education, 14(3), 120-128.